महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY, MAHARASHTRA STATE
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे:४११०६७
Opposite Spicer Memorial College, Aundh, Pune ४११०६७
Telephones: 020-25690480,81,85
Fax No : 020-25690489
E-mail : cah.planning@gmail.com
Extn No: 215,260,247,248,250,252

जा.क्र.एमएडब्ल्युबी-२३(२४)/तांत्रिक-१/सीआर क्र.११५/ १०३४ /२०२३, पसं-६, पुणे-६७,दि. २४.०५.२०२३

## परिपत्रक

### विषय: राज्यातील बैलगाडी शर्यती आयोजीत करण्याबाबत मार्गदर्शक सूचना (SOP)

संदर्भ: (१) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, दिनांक ३१ जुलै, २०१७.
(२) शासन अधिसूचना, कृषि व पदुम विभाग, क्र. पविआ-१०१७/प्र.क्र.६१/भाग-१ / पदुम-३, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७.
(३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे अंतिम आदेश दि. १८ मे, २०२३.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विस्तारीत घटनापीठाने दिनांक १८ मे, २०२३ रोजी प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ मध्ये विहित करण्यात आलेल्या नियम व अटी /शर्तीचे काटेकोरपणे पालन करून राज्यात बैलगाडी शर्यतीचे आयोजनास परवानगी दिलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर आदेशामधील मुद्दा क्र. ४२ नुसार पुढीलप्रमाणे निर्देशीत केले आहे. ***"However, we direct that the law contained in the Act/Rules/Notification shall be strictly enforced by the authorities. In particular, we direct that the District Magistrates/competent authorities shall be responsible for ensuring strict compliance of the law, as amended along with its Rules/Notifications".***

यास अनुसरुन तसेच राज्यात सांस्कृतिक व पारंपारिक प्रथेनुसार बैलगाडी शर्यतीचे आयोजन करताना प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ मध्ये विहित करण्यात आलेल्या नियम व अटी /शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

या मार्गदर्शक सूचनांमध्ये वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ यामध्ये जो सुसंगत अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ अंतिमत: असेल.

<u>जिल्हाधिकारी यांनी करावयाची कार्यवाही</u>:

१. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच **प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७** आणि **महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७** मध्ये विहित करण्यात आलेल्या नियम व अटी /शर्तींचे काटेकोरपणे पालन करुन बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात यावे.

२. उक्त नमूद कायदा व नियम यामधील तरतूदींनुसार महाराष्ट्रातील संस्कृती व परंपरेनुसार साजरे करण्यात येणाऱ्या यात्रा, जत्रा, उत्सव अशाच प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजनास परवानगी देण्यात यावी.

३. राजकीय कार्यक्रम, वाढदिवस इ. प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजनास परवानगी **कोणत्याही परिस्थितीमध्ये** देण्यात येवू नये.

४. उक्त नमूद कायदा व नियम यामधील तरतूदींनुसार राज्यात केवळ **बैलगाडा शर्यत, शंकरपट, छकडी** अशा प्रकारच्या १००० मीटर पेक्षा कमी अंतर असलेल्या बैलगाडी शर्यतीस परवानगी आहे. राज्यात अनधिकृतपणे आयोजित होणाऱ्या **आरत पारत, बैल-घोडा, लाकूड ओंडका ओढणे, चिखलगुट्टा, समुद्रकिनाऱ्यावरील शर्यती, टक्कर तसेच १००० मीटर पेक्षा जास्त अंतराच्या इतर तत्सम बैलगाडी शर्यती** प्रतिबंधीत असतील.

५. उक्त नमूद कायदा व नियम यामधील तरतूदींनुसार बैलगाडी शर्यती आयोजित करु इच्छिणाऱ्या आयोजकांनी किमान १५ दिवस अगोदर यासोबत जोडलेल्या **अनुसूची "अ"** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विहित नमुन्यामध्ये आयोजकाच्या ओळखीचा व पत्त्याच्या पुराव्यासह व बँक हमीच्या स्वरूपात किंवा मुदत ठेव पावतीच्या स्वरूपात रु. ५०,०००/- इतक्या प्रतिभूती ठेवीसह संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करावा.

६. अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अर्जाची तपासणी करुन जेथे बैलगाडी शर्यत आयोजीत होणार आहे त्या ठिकाणी शर्यत आयोजित होण्यासारखी परिस्थिती आहे अथवा नाही याची तपासणी करण्यात यावी. यासाठी एका अथवा त्यापेक्षा अधिक अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. सदर अधिकारी प्रस्तावित बैलगाडी शर्यत आयोजन ठिकाणी भेट देवून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांना ३ दिवसाच्या आत सोबत जोडलेल्या **अनुसूची "इ"** नुसार सादर करतील.

७. सदर अहवालास अनुसरुन जिल्हाधिकारी ४ दिवसांच्या आत बैलगाडी शर्यत आयोजनास सोबत जोडलेल्या **अनुसूची "ड"** नुसार परवानगी देतील अथवा नाकारतील व त्याची प्रत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करतील.

८. अर्ज प्राप्त झाल्यापासून ते परवानगी देणे अथवा नाकारणे याबाबतची कार्यवाही कामकाजाच्या ७ दिवसाच्या आत पुर्ण करतील.

९. परवानगी देतेवेळी जिल्हाधिकारी अर्जात नमूद बैलगाडी शर्यत आयोजनाच्या संपूर्ण कालावधीमध्ये उपस्थित राहण्यासाठी १) नायब तहसिलदार व २) पोलिस उप-निरिक्षक या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या २ अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासह व पदासह आयोजनाचे "**निरीक्षक**" म्हणून प्राधिकृत करतील.

१०. बैलगाडी शर्यतीच्या आयोजना दरम्यान अधिनियमांचे, नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास संबंधीत शर्यत अथवा संपुर्ण शर्यतीचे आयोजन थांबविण्यास सदर "**निरीक्षक**" प्राधिकृत असतील.

११. सदर "**निरीक्षक**" शर्यतीसंबंधीचा अहवाल शर्यत आयोजन संपल्यानंतर ७२ तासाच्या आत सोबत जोडलेल्या **अनुसूची "ई"** नुसार जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

१२. सदर अहवालामध्ये शर्यतीमध्ये भाग घेतलेल्यां व्यक्तींची माहीती, अर्ज, बैल / वळूंचे आरोग्य दाखले इ. व बैलगाडी शर्यती आयोजन नियमानुसार झाल्याबाबतचा अहवाल याचा समावेश असेल.

१३. याशिवाय, जिल्हाधिकारी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी (SPCA) च्या सदस्यांची एक समिती गठित करुन त्यांच्या मार्फत बैलगाडी शर्यतीच्या आयोजनावर देखरेख ठेवतील आणि बैलगाडी शर्यत या नियम व शर्तींनुसार आयोजित केली असल्याची खात्री करतील.

१४. बैलगाडी शर्यतीच्या आयोजनाकरीता जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी (SPCA) च्या सदस्यांच्या समितीमध्ये १) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचा प्रतिनिधी २) बैलगाडी शर्यती आयोजीत होत असलेल्या कार्यक्षेत्रातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) ३) अशासकीय सदस्य अशी समिती गठित करण्यात येईल. सदर समिती आपला स्वतंत्र अहवाल शर्यतीनंतर ७२ तासाच्या आत जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

१५. शर्यतीच्या वेळी कधीही ज्या वळू अथवा बैलांमध्ये थकवा, निर्जलीकरण, अस्वस्थपणा, घोणा फुटणे, दुखापत इ. लक्षणे निरीक्षकांना अथवा समिती सदस्यांना आढळून आल्यास अथवा माहिती प्राप्त झाल्यास अशा वळू अथवा बैलांना बैलगाडी शर्यतीमध्ये भाग घेण्यास मज्जाव करण्यात यावा.

१६. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकरीता आवश्यक पोलिस दल आयोजन स्थळी नेमण्यात यावे. तसेच, आयोजन स्थळी सुरक्षिततेची खबरदारी म्हणून आवश्यक असलेल्या इतर बाबींची (जसे अग्निशमन दल इत्यादी) उपाययोजना करण्याबाबत सूचित करावे.

१७. अहवाल प्राप्त झाल्यावर, बैलगाडी शर्यतीचे आयोजन नियमानुसार झाले असल्याची जिल्हाधिकारी यांची खात्री पटल्यास व आयोजनाचे चित्रीकरण डिजीटल स्वरूपात २ प्रतित प्राप्त झाले असल्यास ३० दिवसाचे आंत जिल्हाधिकारी आयोजकाला प्रतिभूती ठेव परत करतील.

१८. अहवालानुसार जर, आयोजकांनी

अ. नियमांचे, परवानगीच्या अटींचे उल्लंघन केल्यास अथवा

आ. शर्यतीमध्ये भाग घेतलेल्यां व्यक्तींची माहीती, अर्ज, बैल / वळूंचे आरोग्य दाखले, आयोजनाचे चित्रीकरण डिजीटल स्वरूपात २ प्रतित सादर न केल्यास अथवा

इ. ४८ तासाच्या आत कोणत्याही व्यक्तीकडून किंवा जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी (SPCA) कडून आयोजनामध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यास आणि आयोजकांनी नियमांचा भंग केला असल्याची खात्री पटल्यास (अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन ३० दिवसाचे आंत निर्णय घेतील).

तर, जिल्हाधिकारी आयोजकांची प्रतिभूती जप्त करणे व भविष्यात अशी शर्यत आयोजीत करण्यास प्रतिबंधित करणे अशा स्वरुपाची कारवाई याशिवाय कायद्यातील तरतूदीनुसार आवश्यक कारवाई करतील.

१९. आयोजनामध्ये आयोजकांनी अथवा गाडीवानाने अथवा मालकाने नियमांचा भंग केल्यास प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ मधील तरतूदीनुसार तसेच इतर तत्सम अधिनियमानुसार कारवाई करावी.

२०. जिल्ह्यात विनापरवानगी बैलगाडी शर्यतीचे आयोजन होत असल्याचे अथवा झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी व संबंधितावर तात्काळ **गुन्हा नोंदविण्याची** कारवाई करावी.

२१. बैलगाडी शर्यतीच्या संदर्भात असलेल्या नियम व कायद्याच्या संबंधी जागरुकता निर्माण व्हावी याकरीता प्रबोधन करण्यात यावे.

२२. जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक शर्यतीच्या आयोजनाचा संपूर्ण अहवाल सर्व अनुषंगीक कागदपत्रे, आयोजनाच्या चित्रीकरणाची CD यासह ३० दिवसाच्या आत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.

<u>बैलगाडी शर्यतीचे आयोजकांची जबाबदारी:</u>

१. बैलगाडी शर्यतीचे आयोजन करु इच्छिणाऱ्या आयोजकांनी बैलगाडी शर्यत आयोजित करण्याच्या किमान १५ दिवस आधी, यासोबत जोडलेल्या **अनुसूची "अ"** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विहित नमुन्यामध्ये आयोजकाच्या ओळखीचा व पत्त्याच्या पुराव्यासह जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करावा.

२. सदर अर्जासोबत बँक हमीच्या स्वरूपात किंवा मुदत ठेव पावतीच्या स्वरूपात रुपये पन्नास हजार इतक्या प्रतिभूती ठेवी जिल्हाधिकाऱ्याकडे जमा करणे बंधनकारक राहील.

३. महाराष्ट्रातील संस्कृती व परंपरेनुसार साजरे करण्यात येणाऱ्या **यात्रा, जत्रा, उत्सव** अशाच प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजनासाठी अर्ज करावा. राजकीय कार्यक्रम, वाढदिवस इ. प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजनास **कोणत्याही परिस्थितीमध्ये** अर्ज सादर करु नये.

४. उक्त नमूद कायदा व नियम यामधील तरतूदींनुसार राज्यात केवळ **बैलगाडा शर्यत, शंकरपट, छकडी** अशा प्रकारच्या १००० मीटर पेक्षा कमी अंतर असलेल्या बैलगाडी शर्यतीस परवानगी आहे. राज्यात अनधिकृतपणे आयोजित होणाऱ्या **आरत पारत, बैल-घोडा, लाकूड ओंडका ओढणे, चिखलगुट्टा, समुद्रकिनाऱ्यावरील शर्यती, टक्कर तसेच १००० मीटर पेक्षा जास्त अंतराच्या इतर तत्सम बैलगाडी शर्यती** प्रतिबंधीत असतील.

५. विनापरवानगी कोणत्याही परिस्थितीत बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात येवू नये.

६. परवानगी प्राप्त झाल्यावर बैलगाडी शर्यतीसाठी केलेल्या अर्जात आणि दिलेल्या परवानगीत नमूद केलेल्या ठिकाणीच व दिनांकासच बैलगाडी शर्यतीचे आयोजन करावे.

७. शर्यत प्रारंभ होण्यापूर्वी शर्यतीत सहभाग घेणाऱ्यांचे मूळ अर्ज, सोबत जोडलेली कागदपत्रे तसेच सादर केलेले पशुवैद्यकीय आरोग्य प्रमाणपत्रे या आयोजनासाठी प्राधिकृत केलेल्या निरीक्षकांना हस्तांतरीत करावेत.

८. बैलगाडी शर्यतीची धावपट्टी १००० मीटर पेक्षा अधिक लांबीची नसावी.

९. बैलगाडी शर्यतीची धावपट्टी ही अतिशय उतार असलेली, दगड किंवा खडक असलेली, दलदल असलेली, पाणथळीची किंवा पातळ चिखल असलेली नसावी.

१०. धावपट्टीच्या पुढे बैलगाडीचा वेग मंदावण्याकरिता पुरेशी सपाट जागा उपलब्ध करावी.

११. बैलगाडी शर्यत रस्त्यावर किंवा महामार्गावर आयोजित करण्यात येवू नये.

१२. बैलांना किंवा वळूंना धावपट्टीवर आणण्यापूर्वी किमान ३० मिनिटे आराम द्यावा.

१३. कोणत्याही बैलांचा किंवा वळूंचा वापर एका दिवसामध्ये ३ पेक्षा अधिक शर्यतीसाठी करण्यात येवू नये.

१४. केवळ एका गाडीवानास बैलगाडी चालविण्यास परवानगी असेल.

१५. अन्य कोणतेही वाहन धावपट्टीवर किंवा धावपट्टी बाहेर बैलगाडी भोवती चालविता येणार नाही.

१६. <u>कोणताही गाडीवान किंवा बैलांच्या शर्यतीचा प्रस्ताव देणारी व्यक्ती, तिच्याकडे किंवा गाडीवर कोणतीही काठी, चाबुक, पिंजरी किंवा बैलास दुखापत करू शकेल किंवा बैलास विजेचा धक्का देऊ शकेल असे कोणतेही साधन किंवा उपकरण बाळगणार नाही.</u>

१७. <u>बैलाचे पाय बांधणे किंवा बैलास काठीने मारणे अथवा पायाने मारणे अथवा चाबूक अथवा पिंजरी यासारखे कोणतेही साधन अथवा विद्युत धक्का किंवा अन्य साधनाचा वापरणे अथवा जननअंग पिळणे अथवा जननअंगावर लाथ मारणे अथवा आरुने जननअंगास इजा पोहोचवणे अथवा शेपूट पिरगळणे अथवा शेपटीचा चावा घेणे यास गाडीवानास प्रतिबंध असेल.</u>

१८. शर्यतीमध्ये धावणाऱ्या बैलांच्या अथवा वळूंच्या जोड्या या एकमेकांशी योग्यरीत्या सुसंगत असाव्यात.

१९. बैलगाडी शर्यतीकरिता वळू अथवा बैलांना इतर कोणत्याही प्रकारच्या इतर प्राण्यासोबत (उदा. घोडा) जुंपण्यात येणार नाही.

२०. आयोजनाच्या ठिकाणी वळू अथवा बैलांसाठी आरामासाठी पुरेशी सावली / निवारा, पुरेसे खाद्य, चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध असावे.

२१. वळू अथवा बैलांसाठी असलेल्या आरामाची जागा नीटनेटकी, स्वच्छ व आरोग्यदायी असावी.

२२. आयोजकांनी उत्सवामध्ये आवश्यकतेनुसार भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम १९८४ अंतर्गत नोंदणी केलेले कोणतेही नोंदणीकृत पदविधर पशुवैद्यकीय व्यवसायीकाची सेवा किंवा पशुरुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी.

२३. आयोजकांनी बैलगाडी शर्यत आयोजित करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या प्राण्याला कोणत्याही व्यक्तीकडून किंवा त्याचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीकडून कोणत्याही साधनांद्वारे कोणतीही वेदना किंवा यातना दिली जाणार नाही, याची खात्री करावी.

**२४. निरीक्षक व समिती सदस्य यांचेसाठी आयोजनाचे निरीक्षण करणेसाठी व्यवस्था करावी.**

२५. आयोजकांनी बैलांना किंवा वळूंना शर्यती अगोदर किंवा त्यादरम्यान कोणतेही उत्तेजक औषधीद्रव्ये, अल्कोहोल, क्षोभक इत्यादी दिली जात नसल्याची खात्री करावी.

२६. शर्यतीच्या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या कोणत्याही गाडीवानाला अल्कोहोल किंवा मादक द्रव्य प्राशन करण्यास किंवा बाळगण्यास मनाई असेल.

२७. आयोजकाने बैलगाडी शर्यतीच्या आयोजनाचे संपूर्ण चित्रिकरण करावे व सदर चित्रीकरण १५ दिवसाच्या आंत जिल्हाधिकारी यांना डिजीटल स्वरूपात २ प्रतित सादर करावे.

२८. बैलगाडी शर्यतीच्या वेळी उपस्थित प्रेक्षकांसाठी वैद्यकीय सेवा किंवा रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करुन दिली आहे याची सुनिश्चिती करावी.

२९. बैलगाडी शर्यतीच्या वेळी प्रेक्षकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व सावधगिरीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत याची सुनिश्चित करावी.

३०. बैलांच्या धावपट्टीच्या दोन्ही बाजूस सुरक्षित अंतरावर प्रतिबंधात्मक कठडे उभारावेत अथवा इतर सुरक्षेचे उपाय करावेत जेणेकरुन प्रेक्षकांचा उपद्रव हा धावणाऱ्या बैलांना होणार नाही.

३१. बैलगाडीच्या शर्यती दरम्यान गाडीवानास, बैलगाडीच्या चाकात व इतरत्र अडकून अपघात होऊ शकेल, अशा स्वरूपाचे कोणतेही सैल अथवा तत्सम स्वरूपाचे कपडे परिधान करण्यास प्रतिबंध राहील.

३२. प्राण्यांच्या, गाडीवानाच्या व प्रेक्षकांच्या सुरक्षेबाबत आयोजकांना जबाबदार धरण्यात येईल.

३३. प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ चे उल्लंघन झाल्यास आयोजकांना जबाबदार धरण्यात येईल व प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ च्या कलम ३(३) नुसार तसेच इतर तत्सम अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शर्यतीमध्ये भाग घेणाऱ्यांची जबाबदारी:

१. बैलगाडी शर्यतीमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या गाडीवान अथवा सहभागी यांनी ४८ तास आधी, यासोबत जोडलेल्या **अनुसूची "क"** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विहित नमुन्यामध्ये स्वत:च्या ओळखीचा व पत्त्याच्या पुराव्यासह तसेच बैल/वळू यांच्या फोटोसह आयोजकाकडे अर्ज करावा.
२. बैलगाडी शर्यतीमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या गाडीवान अथवा सहभागी यांनी शर्यतीच्या अगोदर बैल/वळू यांची नोंदणीकृत पदवीधर पशुवैद्यकांमार्फत तपासणी करुन घ्यावी व सदर बैल/वळू यांचे फ़िटनेस प्रमाणपत्र यासोबत जोडलेल्या **अनुसूची "ब"** प्रमाणे प्राप्त करुन घ्यावे.
३. सदर प्रमाणपत्र शर्यतीचा दिवस धरुन ४८ तासासाठी वैध असेल.
४. ज्या गाडीवाना करिता व बैलाकरिता अर्ज व पशुवैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले असतील केवळ तोच गाडीवान/बैल शर्यतीत भाग घेण्यास हक्कदार असेल.
५. विना अर्ज अथवा विना पशुवैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय शर्यतीत भाग घेतल्यास नियमांचा भंग ठरेल.
६. कोणताही गाडीवान किंवा बैलांच्या शर्यतीचा प्रस्ताव देणारी व्यक्ती, तिच्याकडे किंवा गाडीवर कोणतीही काठी, चाबुक, पिंजरी किंवा बैलास दुखापत करू शकेल किंवा बैलास विजेचा धक्का देऊ शकेल असे कोणतेही साधन किंवा उपकरण बाळगणार नाही.
७. बैलाचे पाय बांधणे किंवा बैलास काठीने मारणे अथवा पायाने मारणे अथवा चाबूक अथवा पिंजरी यासारखे कोणतेही साधन अथवा विद्युत धक्का किंवा अन्य साधनाचा वापरणे अथवा जननअंग पिळणे अथवा जननअंगावर लाथ मारणे अथवा आरुने जननअंगास इजा पोहोचवणे अथवा शेपूट पिरगळणे अथवा शेपटीचा चावा घेणे यास गाडीवानास प्रतिबंध असेल.
८. बैलगाडी शर्यत आयोजित करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या प्राण्याला कोणत्याही व्यक्तीकडून किंवा त्याचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीकडून कोणत्याही साधनांद्वारे कोणतीही वेदना किंवा यातना दिली जाणार नाही याची खात्री करावी.
९. शर्यतीच्या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या कोणत्याही गाडीवानाला अल्कोहोल किंवा मादक द्रव्य प्राशन करण्यास किंवा बाळगण्यास मनाई असेल.
१०. गाडीवानाने बैलास मारहाण केली अथवा क्रुरता केल्यास संबंधित गाडीवान व त्यांचे मालक यांचेवर उक्त नमूद कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायी यांची जबाबदारी:

१. भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम १९८४ अंतर्गत कलम २ च्या पोटकलम (ग) अन्वये नोंदणी केलेले कोणतेही नोंदणीकृत पदविधर पशुवैद्यक व्यवसायी बैलगाडी शर्यतीसाठी बैल अथवा वळू यांची तपासणी करुन त्यांचे फिटनेस प्रमाणपत्र देण्यास प्राधिकृत असतील.
२. नोंदणीकृत पदविधर पशुवैद्यक व्यवसायी यांनी बैलगाडी शर्यतीसाठी बैल अथवा वळू यांची काटेकोरपणे तपासणी करुन **अनुसूची "ब"** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात मराठी / इंग्रजी भाषेत फिटनेस प्रमाणपत्र द्यावे.
३. नोंदणीकृत पदविधर पशुवैद्यक व्यवसायी यांनी बैलाची/ वळूची तपासणी केल्याखेरीज प्रमाणपत्र दिले अथवा चुकीचे प्रमाणपत्र दिले तर त्यांच्याविरुद्ध भारतीय पशुवैद्यक परिषद (पशुवैद्यक व्यावसायिक यांचे व्यावसायिक आचरण, शिष्टाचार, नितीशास्त्रीय संहिता यासंबंधिचे मानक) विनियम १९९२ अन्वये कारवाई केली जाईल.

**शास्ती व दंड:**

प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ च्या कलम ३ च्या पोटकलम ३ च्या तरतुदी नुसार जी कोणतीही व्यक्ती किंवा बैलगाडी शर्यतीच्या आयोजनातील प्राण्यांचा ताबा असणारी व्यक्ती बैलगाडी शर्यती संबंधी व त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करील किंवा त्या प्राण्यांना वेदना किंवा यातना देईल ती व्यक्ती **पाच लाख रुपया पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस** पात्र असेल.

उपरोक्त प्रमाणे नियम व अटींचे पालन करुन महाराष्ट्रातील संस्कृती व परंपरेनुसार साजरे करण्यात येणाऱ्या यात्रा, जत्रा, उत्सव अशाच प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे तसेच, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

24/3/2023

**(सचिन्द्र प्रताप सिंह,** भा.प्र.से.)
**आयुक्त पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७**

प्रति,

जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी (SPCA), सर्व जिल्हे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

१. मा. प्रधान सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, मंत्रालय, मुंबई-३२.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

२. अध्यक्ष, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे.
३. अध्यक्ष, महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदे सनियंत्रण समिती, मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. पोलीस आयुक्त, सर्व.
६. पोलीस अधिक्षक, सर्व.
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, सर्व.
८. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, सर्व.
९. निबंधक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर.
१०. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त तथा सदस्य सचिव, जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी (SPCA), सर्व.

    २/ आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या जिल्ह्यातील बैलगाडी शर्यतीचे आयोजनाकरिता उक्त नमूद नुसार समितीची नेमणूक करावी व आयोजना दरम्यान बैलांवर क्रूरता होणार नाही यासाठीच्या उपाययोजना कराव्यात.

११. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सर्व.
१२. IT-Hub यांना विभागाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

## अनुसूची-अ

[ नियम क्र. ३ (१) पहा ]

**बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेसाठी अर्जाचा नमुना**

प्रति,

जिल्हाधिकारी, .............................. जिल्हा

अर्जदाराचे छायाचित्र

१. अर्जदाराचे नाव :—

२. पत्ता व दूरध्वनी क्रमांक :—

३. मी/आम्ही, खालील सही करणार, ........................................................ (पारंपरिक उत्सवाचे नाव/आयोजन नमूद करा) या उत्सवाच्या प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजन करु इच्छितो.

४. स्पर्धा घेण्याचा/घेण्याचे दिनांक :—

५. ठिकाण :—

६. ज्यावेळी स्पर्धा आयोजित करावयाची आहे, ती वेळ :—

७. शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या वळू/बैलांची संभाव्य संख्या :—

८. शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या बैलगाड्यांची संभाव्य संख्या :—

मी/आम्ही, याद्वारे घोषित करतो की, मी/आम्ही प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० ( १९६० चा ५९), महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या तरतुदींचे आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यत आयोजन) नियम, २०१७ चे पालन करीन/करु. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास मी/आम्ही कायद्याद्वारे होणाऱ्या शिक्षेस पात्र राहीन/राहू.

मी/आम्ही, याद्वारे रुपये पन्नास हजार इतक्या रकमेची प्रतिभूती ठेव, बँक हमी/मुदत ठेव पावती क्र. ...................... बँकेचे नाव ...................... या स्वरुपात जमा करीत आहे/आहोत.

स्वाक्षरी/स्वाक्षऱ्या

दिनांक

## अनुसूची-ब

[ नियम क्र. ५ (२) पहा ]

**प्राण्यांचे स्वास्थ्य-नि-आरोग्यविषयक प्रमाणपत्र**

( या नमुन्यातील प्रमाणपत्र नोंदणीकृत पशुवैद्यकीय व्यावसायीकाकडून प्राप्त करुन घ्यावे )

१. पशुपालकाचे नाव व पत्ता :—

२. प्राण्याची माहिती :—(अ) प्राण्याची प्रजात/प्रकार : (ब) वय :

(क) वजन : (ड) उंची :

(इ) रंग :

(फ) ओळख खूण कोणतीही असल्यास :

३. तपासणीचा दिनांक :— तपासणीची वेळ :—

मी, याद्वारे असे प्रमाणित करतो की, वरील प्राण्याची मी तपासणी केली असून, प्रमाणित करण्यात येते की, सदर प्राणी बैलगाडी शर्यतीसाठी तंदुरुस्त आहे.

हे प्रमाणपत्र ४८ तासांसाठी वैध आहे.

स्वाक्षरी :

नाव व पत्ता :

नोंदणी क्रमांक :

शिक्का :

**सहपत्रे** : सहभाग घेणाऱ्या बैलांची किंवा वळूंची छायाचित्रे.

## अनुसूची-क

[ नियम क्र. ५ (१) पहा ]

**बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठीच्या अर्जाचा नमूना**

प्रति,

आयोजक,

.................. यात्रा/जत्रा समिती

जिल्हा ................

१. अर्जदाराचे नाव :

२. पत्ता व संपर्काचा (दूरध्वनी/भ्रमणध्वनी) क्रमांक :

३. मी/आम्ही, खालील सही करणार, आपणाकडून आयोजित केलेल्या बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छित आहे/आहोत.

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मला प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० (१९६० चा ५९) महाराष्ट्र राज्यात लागू असताना त्याच्या आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यत आयोजन) नियम, २०१७ याच्या तरतुदी माहीत आहेत. मी सदर तरतुदींचे पूर्णपणे पालन करील आणि त्यास बांधील राहील अशी हमी देत आहे. या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास मी शिक्षा केली जाण्यास पात्र असेन.

स्वाक्षरीः ................

दिनांक : ................

**सहपत्रे :**

१. बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबतचा पुरावा.

२. बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या बैलांची किंवा वळूंची छायाचित्रे.

*Schedule* " A "

[ *See* rule- 3(*1*) ]

**FORM FOR APPLICATION FOR BULLOCK CART RACE EVENT**

To,

Collector, District ..........................

| Photograph of Applicant |
|---|

1. Name of Applicant :
2. Address and Telephone Number :
3. I/We, the undersigned would like to conduct the bullock cart race event on occasion of............................ (Specify traditional occasion/event).
4. Date/s of event :
5. Venue :
6. Time when the event is Scheduled to be held :
7. Number of bulls/bullocks likely to take part in the event :
8. Number of bull/bullock carts likely to take part in the event :

I/We hereby declare that the provisions of the Prevention of Cruelty to Animals Act, 1960 (59 of 1960), in its application to the State of Maharashtra, and the Maharashtra Prevention of Cruelty to Animals (conduct of bullock cart race) Rules, 2017 will be followed. I/We may be punished by law in contravention of the provisions of this Act and the rules made thereunder.

I/We hereby submit the security deposit in the form of Bank Guarantee/Term Deposit Receipt No. ............., Bank Name ........................................................................ of Rupees Fifty Thousand.

Signature/s. ......................

Date : ...............................

*Schedule* " B "

[ *See* rule- 5(2) ]

**ANIMAL FITNESS-*CUM*-HEALTH CERTIFICATE**

( To be obtained from Registered Veterinary Practitioner )

1. Name and Address of Animal Owner :
2. Animal Details : (*a*) Breed/Type of Animal :

   (*b*) Age :

   (*c*) Weight :

   (*d*) Height :

   (*e*) Colour:

   (*f*) Identification marks if any :
3. Date of Examination : Time of Examination :

I hereby certify that I have examined the above animal and certify that, the animal is fit for the bullock cart race.

This Certificate is valid for forty-eight hours.

Signed :

Name and Address :

Registration Number :

Seal :

Enclosure : Photographs of participating Bulls or Bullocks.

*Schedule* " C "

[ *See* rule- 5(*1*) ]

**FORM FOR APPLICATION FOR PARTICIPATING IN BULLOCK CART RACE EVENT**

To,

Organizer,

............................................. Yatra/Jatra Committee

District ...............................

1. Name of Applicant :

2. Address and Contact Number :

3. I/We, the undersigned would like to participate in the bullock cart race event organized by you.

I hereby declare that I am aware of the provisions of the Prevention of Cruelty to Animals Act, 1960 (59 of 1960), in its application to the State of Maharashtra, and the Maharashtra Prevention of Cruelty to Animals (conduct of bullock cart race) Rules, 2017. I undertake to fully comply with and abide by the same. I may be punished by law in contravention of the provisions of this Act and the rules made thereunder.

Signature: ..........................

Date : ................................

Enclosure :

1. Identity Proof of participant

2. Photographs of participating Bulls or Bullocks.

# अनुसूची-ड

[नियम क्र. ४(१) पहा]

## बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धेसाठी परवानगीचा नमुना

प्रति,

आयोजक,

------------- यात्रा/जत्रा समिती

जिल्हा-------------

संदर्भ: १. आपला अर्ज, दिनांक ---------.

२. अनुसूची "--" नुसार प्राप्त अहवाल.

१. अर्जदाराचे नाव :-
२. पत्ता व संपर्काचा (दुरध्वनी/भ्रमणध्वनी) क्र.:-
३. स्पर्धा घेण्याचा/ घेण्याचे दिनांक:
४. ठिकाण:
५. शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या वळू/बैलांची संभाव्य संख्या :-
६. शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या बैलगाडयांची संभाव्य संख्या :-

अ. आपणास आपल्या अर्जामध्ये नमूद केल्यानुसार पारंपरिक उत्सवाचे नाव/आयोजन ------------------ --------------- या उत्सवाच्या प्रसंगी बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर आयोजनामध्ये प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० (१९६० चा ५९), महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या तरतुदींचे आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यत आयोजन) नियम, २०१७ चे पालन करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास आपण कायद्याद्वारे होणाऱ्या शिक्षेस पात्र राहाल. सदर आयोजनासाठी खालील अधिकाऱ्यांची **निरीक्षक** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

१. श्री. /श्रीमती ----------------------------------, नायब तहसिलदार------------
२. श्री. /श्रीमती ----------------------------------, पोलीस निरीक्षक-------------

ब) संदर्भ क्र. २ अन्वये आपला अर्ज महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यत आयोजन) नियम, २०१७ मधील तरतुदींची पुर्तता करु शकत नसल्याने आपणास बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यास परवानगी नाकारण्यात येत आहे.

क) इतर आवश्यक अटी व शर्ती (जिल्हानुरुप).

स्वाक्षरी

जिल्हाधिकारी, जिल्हा --------

प्रत:

१) आयुक्त पशुसंवर्धन, म.रा., पुणे-६७
२) पोलीस आयुक्त /जिल्हा पोलीस अधिक्षक,
३) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त तथा सदस्य सचिव, जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी.
४) श्री. /श्रीमती ----------------------------------, नायब तहसिलदार
५) श्री. /श्रीमती ----------------------------------, पोलीस निरीक्षक
६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा-----------.

## अनुसूची “इ”

### जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने बैलगाडी शर्यत आयोजनापुर्वी सादर करावयाचा निरिक्षण अहवाल.

| अ.क्र. | तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | पत्ता व संपर्काचा (दुरध्वनी/भ्रमणध्वनी) क्र. | |
| ३ | स्पर्धेचा प्रकार (बैलगाडा शर्यत/ शंकरपट/ छकडी) | |
| ४ | स्पर्धा घेण्याचे ठिकाण व पत्ता | |
| ५ | स्पर्धा घेण्याचा दिनांक | |
| ६ | शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या वळू/बैलांची संभाव्य संख्या | |
| ७ | शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या बैलगाडयांची संभाव्य संख्या | |
| ८ | बैलगाडी शर्यतीसाठी धावपट्टी निकषाप्रमाणे आहे का?: | होय/नाही |
| ९ | बैलांच्या धावपट्टीच्या दोन्ही बाजूस आवश्यकतेनुसार सुरक्षेचे उपाय केले आहेत काय? | होय/नाही |
| १० | आयोजनाच्या ठिकाणी बैल/वळू करिता आवश्यक सोयी सुविधा/प्रयोजन केले आहे काय? | होय/नाही |
| ११ | निरीक्षक व समिती सदस्य यांचेसाठी आयोजनाचे निरीक्षण करणेसाठी व्यवस्था केली आहे काय? | होय/नाही |
| १२ | आयोजन परिक्षेत्रात संसर्गजन्य रोग प्रादुर्भाव परिस्थिती आहे किंवा कसे? | होय/नाही |
| १३ | अर्जदारास प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ यामधील नियमांबाबत अवगत आहे काय/अवगत करण्यात आले आहे काय? | होय/नाही |

उक्त बाबींचे निरीक्षण व महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ च्या अनुषंगाने प्रस्तावित बैलगाडी शर्यतीच्या आयोजनास परवानगी देण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे/नाही.

शिफारस नसल्यास कारणे:--------

नांव:

पदनाम व स्वाक्षरी:

प्रति,

मा. जिल्हाधिकारी-------------- जिल्हा.

## अनुसूची “ई”

### जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले निरीक्षक यांनी बैलगाडी शर्यत पार पडल्यानंतर सादर करावयाचा निरिक्षण अहवाल.

| अ.क्र. | तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | पत्ता व संपर्काचा (दुरध्वनी/भ्रमणध्वनी) क्र. | |
| ३ | स्पर्धा घेण्याचे ठिकाण व दिनांक | |
| ४ | स्पर्धा घेण्याचे प्रयोजन | |
| ५ | स्पर्धा घेण्याचा दिनांक | |
| ६ | शर्यतीमध्ये सहभागी वळू/बैलांची संख्या | |
| ७ | शर्यतीमध्ये सहभागी बैलगाड्यांची संख्या | |
| ८ | शर्यतीमध्ये सहभागी बैल/वळूंचे आरोग्य प्रमाणपत्रे सादर केल्याची संख्या | |
| ९ | उपस्थित नोंदणीकृत पशुवैद्यकांची संख्या (नांव व नोंदणी क्र.) | |
| १० | पशुरुग्ण वाहिका उपलब्ध करुन देण्यात आली होती काय? | होय/नाही |
| ११ | निरीक्षक व समिती सदस्य यांचेसाठी आयोजनाचे निरीक्षण करणेसाठी व्यवस्था करण्यात आली होती काय? | होय/नाही |
| १२ | उपस्थित प्रेक्षकांसाठी वैद्यकीय सेवा किंवा रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करुन दिली आहे काय? | होय/ नाही |
| १३ | धावपट्टी नियमानुसार होती काय? व त्याची लांबी मीटरमध्ये | |
| १४ | बैलांच्या धावपट्टीच्या दोन्ही बाजूस आवश्यकतेनुसार सुरक्षेचे उपाय केले आहेत काय? | होय/ नाही |
| १५ | बैलगाडी शर्यतीच्या वेळी प्रेक्षकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व सावधगिरीच्या उपाययोजना केल्या होत्या काय? | होय/ नाही |
| १६ | आयोजकाने बैलगाडी शर्यतीच्या आयोजनाचे संपूर्ण चित्रिकरण केले आहे काय? | होय/ नाही |
| १७ | आयोजक, बैलगाडा मालक व गाडीवान यांनी प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ आणि महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ यामधील नियमांचे पालन केले आहे काय? | होय/ नाही |
| १८ | इतर निरीक्षणे व अभिप्राय | |

उक्त बाबींची तपासणी व महाराष्ट्र प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (बैलगाडी शर्यतीचे आयोजन) नियम २०१७ च्या अनुषंगाने बैलगाडी शर्यतीचे आयोजन केले आहे/नाही.

नसल्यास कारणे:

१.

२.

प्रस्तावित कारवाई: ----------------------------------------

सहपत्र: १. बैल/वळूंचे आरोग्य दाखले.
२. आयोजककडे अनुसूची-क प्रमाणे सादर मूळ अर्ज.
३. शर्यतीची छायाचित्रे.
४. शर्यतीचे संपूर्ण चित्रीकरण.

१. निरीक्षकाचे नांव:
पदनाम व स्वाक्षरी:

२. निरीक्षकाचे नांव:
पदनाम व स्वाक्षरी:

प्रति,

मा. जिल्हाधिकारी-------------- जिल्हा.